नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक : ०२/०७/२०२६

पुणे महानगरपालिका
मा.स्थायी समिती
दाखल कार्यपत्रिका

विषय क्र. ३६०त्वर्य

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक आवारातील लायब्ररी इमारतीचे अर्धवट कामे पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Bramha Construction यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२५४६९३०/- पेक्षा १५.२१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२१५९५४१=९५ अधिक जी.एस.टी. र.रु.३८८७१८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२५४८२५९=९५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/२०८, दि.२९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६१त्वर्य

पुणे मनपाच्या परिमंडळ क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या विविध स्मशानभूमीची ऑपरेटिंग ची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JP Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९८०२७९९/- पेक्षा २.००% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९९८८५४=९८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु. ९९९८८५४=९८ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम या दिनांका (१४-०४-२०२६) पासून काम सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२१०, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६२त्वर्य

पुणे महानगरपालिकेचे बावधन येथे असलेले प्राण्यांचे इन्सीनेटर बोपोडी stp परिसरात स्थलांतरीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Vichare And Company Private Limited यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३३१४५८/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ०.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३१४८००=७१ अधिक जी.एस.टी. र.रु.५९६६६४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३९११४६४=७१ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु

करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२११, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६३त्वर्य

प्रभाग क्र. १० बावधन येथील राजा शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे उर्वरित कामे करणे अंतर्गत स्केटिंग रिंक व टेनिस कोर्ट येथे सिंथेटिक कोटिंग व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ROHIT CONSTRUCTIONS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९३९०६१/- पेक्षा १२.०४०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५८५१९८=०६ अधिक जी.एस.टी. र.रु.४६५३३६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२५९४२/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५९४५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३०८२४२१=०६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/२१३, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६४त्वर्य

पुणे पेठ कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये खुर्च्या व कार्पेट बदलणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Concept Creator यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६८१२२५०/- पेक्षा ९.६६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१५४१८६=६५ अधिक जी.एस.टी. र.रु.११०७७५४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.७२६१९४०=६५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/२१५, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६५त्वर्य

पुणे महानगरपालिका क्षेत्रात पूर प्रवन भागात तसेच नदी किनारी भागात नागरिकांना पूर्वसूचना देणेकरीता पब्लिक अँड्रेस सिस्टीम उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Sunlights Developer यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२२०६५४/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५८७५५५=९ अधिक जी.एस.टी. र.रु.६४५७६०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४२३३३१५=९ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (१०-०४-२०२६) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२१६, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६६त्वर्य

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ. नायडू रूग्णालय यांना अनुक्रमे अंदाजे लागणारे २५,५५० लिटर्स व ७,३०० लिटरर्स दुध दि.१/४/२०२६ ते ३१/३/२०२७ या मुदतीसाठी पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ (कात्रज), पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर टोण्ड दुध रू. ५४.९०/- या दराने होणारी रक्कम रू १८,०३,४६५/-अक्षरी रू. अठरा लाख तीन हजार चारशे पासष्ट फक्त) पर्यंत व अगर रुग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ झाल्यास, शासनाने वेळोवेळी दर बदलले असल्यास त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहच दर त्याप्रमाणे होणा-या रकमेपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५, २(२) नुसार दुध पुरविण्यासाठी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज), पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ /आरोग्य /२२१, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६७त्वर्य

निविदा क्र. PMC/SWM/2024-25/50 Selection of Contractor for Mechanical Sweeping of Main Roads in Zone 2 of Pune city using Truck Mounted Road Sweepers for Seven Years या कामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून करारनाम्यातील अटी शर्ती नुसार टेंडर मान्य दराने यांत्रिकीकरणाने साफसफाईचे काम आठवड्यातील सर्व दिवस काम करून घेणेकरिता पुढील निविदा कालावधी करिता र. रु. ६,३५,१६,५९२=८० इतक्या रक्कमेचे अतिरिक्त काम करून घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा /२३१, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६८त्वर्य

पुणे महानगरपालिकेकडील अधिकृत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र / परवाना वारस व्यक्तीस हस्तांतरण करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /अतिक्रमण/२२६, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३६९त्वर्य

निविदा क्र. PMC/SWM/2024-25/52 Selection of Contractor for Mechanical Sweeping of Main Roads in Zone 4 of Pune city using Truck Mounted Road Sweepers for Seven Years याकामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून करारनाम्यातील अटी शर्ती नुसार टेंडर मान्य दराने यांत्रिकीकरणाने साफसफाईचे काम आठवड्यातील सर्व दिवस काम करून घेणेकरिता पुढील निविदा कालावधी करिता र. रु. ६,४८,७५,९४३=२० इतक्या

रक्कमेचे अतिरिक्त काम करून घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२३२, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७०त्वर्य

निविदा क्र. PMC/SWM/2024-25/51 Selection of Contractor for Mechanical Sweeping of Main Roads in Zone 3 of Pune city using Truck Mounted Road Sweepers for Seven Years याकामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून करारनाम्यातील अटी शर्ती नुसार टेंडर मान्य दराने यांत्रिकीकरणाने साफसफाईचे काम आठवड्यातील सर्व दिवस काम करून घेणेकरिता पुढील निविदा कालावधी करिता र. रु. ६,३५,१६,५९२=८० इतक्या रक्कमेचे अतिरिक्त काम करून घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२३३, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७१त्वर्य

प्रभाग क्र. ४० मधील आगम मंदिर परिसर अंजली नगर वंडर सिटी व इतर परिसरातील वितरण व्यवस्था नियंत्रित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Pravin Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३९९९३३२/- पेक्षा ०.००%) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९९९३३२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३९९९३३२/- तसेच (११-०२-२०२६) पासून काम सुरु करणेस दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.४०,००,०००) पर्यंत व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२४२, दि. ०१/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७२त्वर्य

केशवनगर, साडेसतरानळी परिसरामध्ये टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SANTOSH WATER TANKER यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९९९९९/- पेक्षा ५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९४९९९९९=०५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९४९९९९९=०५ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (०९-१२-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९९९९९९९/-) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२४४, दि. ०१/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७३त्वर्य

औंध व घोले रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या भागात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SANTOSH WATER TANKER यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९९५३५/- पेक्षा ५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९४९९५५८=२५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९४९९५५८=२५ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२२-०१-२०२६) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९९९९५३५/-) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२४५, दि. ०१/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७४त्वर्य

नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नव्याने समाविष्ट गावामधील (वाघोली-लोहगाव) नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. J.B. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९९९९८/- पेक्षा १०.९९०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४५०४९८=२२ अधिक जी.एस.टी. र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४४५०४९८=२२ पर्यंत ब पाकीट उघडलेचे दिनांक (२०-०३-२०२६) पासून त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.१/२४८, दि. ०२/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७५त्वर्य

पुणे मनपाच्या परिमंडळ क्रमांक २ अंतर्गत येणाऱ्या विविध स्मशानभूमीची ऑपरेटिंग ची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SBC SOLUTIONS यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९३५७२१७/- पेक्षा २% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.९५४४३६१=३४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९५४४३६१=३४ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम या दिनांका (०१-०५-२०२६) पासून काम सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२१२, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७६त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील विविध मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथे निर्जंतुकीकरण करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरीन डायऑक्साईड (CLO2) पावडरचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GIRIRAJ TRADING COMPANY यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८२५०००/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ४.५% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.८६२१२५०/- अधिक जी.एस.टी. र.रु.१५५१८२५/- अधिक

रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.१०१७३०७५/- पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/२१४, दि. २९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७७त्वर्य

पुणे पेठ येरवडा बिंदुमाधव ठाकरे चौक संगमवाडी ते आंबेडकर चौक येरवडा दरम्यानचा अस्तित्वातील २० ते २५ मी. रुंदीचा रस्ता महानगरपालिका अधिनियम चे कलम २१०(१)(ब) नुसार ३० मी. रस्तारुंदी प्रमाणरेषा आखूण कायम करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन/२४०, दि. ०१/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७८त्वर्य

बंडगार्डन पाणीपुरवठा विभाग अंतर्गत टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SANTOSH WATER TANKER यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९८९२५/- पेक्षा ५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९४९८९७८=७५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९४९८९७८=७५ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (०९-०२-२०२६) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.९९९८९२५/-) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२४३, दि. ०१/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३७९त्वर्य

मा.तन्वी दिवेकर व मा.सई थोपटे यांचे दि. २३/०६/२०२६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी ठराव क्र. २०६८, दि.२७/०३/२०२६ वर प्राप्त झालेला मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व.व्य /२०४, दि. २५/०६/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

विषय क्र. ३८०त्वर्य

मा.प्रशांत जगताप व मा. अमोल बालवडकर यांचे दि.०९/०४/२०२६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी ठराव क्र.४९, दि.०९/०४/२०२६ वर प्राप्त झालेला मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/२१८, दि.२९/०६/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

विषय क्र. ३८१त्वर्य

नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. J.B. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४३३३५५/- पेक्षा १०.९९०% ने कमी)

असल्याने त्यांचेकडून र.रु.७५०६५२९=२९ अधिक जी.एस.टी. र.रु.१३५११७५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४८६४१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.८९०६३४५=२९ पर्यंत ब पाकीट उघडलेचे दिनांक (२०-०३-२०२६) पासून काम सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.१/२४६, दि. ०२/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३८२त्वर्य

नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N. CHAVAN यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९९९९६२/- पेक्षा ७.८८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२११९६४=९९ अधिक जी.एस.टी. र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९२११९६४=९९ पर्यंत ब पाकीट उघडलेचे दिनांक (२०-०३-२०२६) पासून काम सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.१/२४७, दि. ०२/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३८३त्वर्य

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ११ गावांपैकी आंबेगाव बुद्रुक, आंबेगाव खुर्द व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र.१ यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विविध भागात मागणीनुसार टँकरने पाणीपुरवठा करणे कामी ठेकेदार श्री राजा कंस्ट्रक्शन यांचेकडून मान्य निविदा दर २.००% कमी दराने निविदा रकमेच्या दिडपट रक्कमेपर्यंत र.रु.(३,९४,८४,४८८.१२ + १,९७,४२,२४४.०६ =५,९२,२६,७३२.१८) पर्यंतचे वाढीव काम दोन महिने मुदतवाढ देऊन करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु /२५०, दि. ०२/०७/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३८४त्वर्य

मा.खंडू सतीश लोंढे व मा.पायल विराज तुपे यांचे, दि. ३०/०६/२०२६ चे पत्र.

समाज विकास विभागाच्या वतीने अनुक्रमे १) प्रबुद्ध स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,२) जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, ३) हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या,४)विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या, या संस्थांचे सभासद सुमारे ३४ वर्षापासून सन १९८९, १९० व १९९८ पासून पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाच्या (पूर्वीचे नागरवस्ती विकास योजना खात्याच्या) वस्तीपातळीवरील उपक्रमांत सहभागी आहेत. समाज विकास विभागाच्या लाभार्थ्यांसह क्षेत्रीय कार्यालय स्तरावर काम क्रीत आहेत. विशेषतः साक्षरता अभियान, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अशा काही वर्षापूर्वी शासन तसेच पुणे महानगरपालिकेच्या उपक्रमांमध्ये या संस्थांचा सक्रीय सहभाग आहे. तसेच समाज विकास विभागाचे कामाकाज वस्ती पातळीवर उभे करताना या संस्थांच्या सभासदांचा सहभाग असतो,

या चारही संस्थाना कशाप्रकारे कामे द्यावीत याबद्दल समाज विकास विभागाच्या वतीने जावक क्र. सविवि/३८६, दि.५.६.२०२४ चे निविदेनानुसार सादर करण्यात आले होते. या निवेदनास मा.मुख्यलेखाधिकारी व मा.उपायुक्त दक्षता यांची मानता झालेली आहे. सदर निवेदनाप्रमाने कार्यवाही व्हावी किंवा या चारही संस्थाना महापालिके अंतर्गत र.रु.३ लक्ष पर्यंतची कामे विना निविदा मिळणेस खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत

१. प्रबुद्ध स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या दोन संस्थांना रक्कम रुपये तीन लाखापर्यंतचे पुणे महानगरपालिका अंतर्गत करावयाची विविध कामे विना निविदा देणे व विविध सेवा घेणे तसेच स्वयंरोजगाराच्या योजना चालवण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत स्थायी समितीचा ठराव क्र.७८४ दि.३१/०७/२०१८ व या ठरावाच्या अनुषंगाने पारित झालेला महापालिका आयुक्त यांचा ठराव व कार्यालयीन परिपत्रक तसेच हेल्पलाइन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित व विश्वासआधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थांना शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन रक्कम रुपये तीन लाखापर्यंत लागणाऱ्या सेवा व वस्तू घेण्यासाठी काम विना निविदा देणे बाबत स्थायी समितीचा ठराव क्र. २८७४ दि.०८/०३/२०१९ व या ठरावाच्या अनुषंगाने पारित झालेला महापालिका आयुक्त यांचा ठराव व कार्यालयीन परिपत्रक प्रमाणे कार्यवाही होणेस.

२. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाला व पुणे महानगरपालिका सर्व विभागांमध्ये तातडीचे व आकस्मिक कामांबरोबरच नियमित परंतू ३ लाखांच्या आतील कामे करून घेणेसाठी ज्या संस्थांना मा. महापालिका आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता आहे अशा १) हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., २) विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., ३) प्रबुध्द स्वयंरोजगार सहकारी संस्था, ४) जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या संस्थांना एकसमान कामे देण्यात यावीत.

३. प्रत्येक संस्थेस प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रती वर्ष १० कामे व प्रत्येक परिमंडळ निहाय प्रत्येक संस्थेस प्रति वर्ष १० कामे या मयदित कामे देण्यात यावीत.

४. या कामाचा हिशोब प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय व प्रत्येक परिमंडळ निहाय ठेवणेत यावा.

५. सुशिक्षित बेरोजगारांच्या कामे देण्याच्या धोरणात शासनाने काही बदल केल्यास तसा बदल वरील चार संस्थांबाबत वेळोवेळी करण्यात यावा.

विषय क्र. ३८५त्वर्य

मा.बाळा उर्फ प्रमोद ओसवाल व मा.तन्वी प्रशांत दिवेकर यांचे, दि. ३०/०६/२०२६ चे पत्र.

समाज विकास विभागाच्या वतीने अनुक्रमे १) प्रबुद्ध स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,२) जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, ३) हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या,४)विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या, या संस्थांचे सभासद सुमारे ३४ वर्षापासून सन १९८९, १९० व १९९८ पासून पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाच्या (पूर्वीचे नागरवस्ती विकास योजना खात्याच्या) वस्तीपातळीवरील उपक्रमांत सहभागी आहेत. समाज विकास विभागाच्या लाभार्थ्यांसह क्षेत्रीय कार्यालय स्तरावर काम क्रीत आहेत. विशेषतः साक्षरता अभियान, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अशा काही वर्षापूर्वी शासन तसेच पुणे महानगरपालिकेच्या

उपक्रमांमध्ये या संस्थांचा सक्रीय सहभाग आहे. तसेच समाज विकास विभागाचे कामाकाज वस्ती पातळीवर उभे करताना या संस्थांच्या सभासदांचा सहभाग असतो,

या चारही संस्थाना कशाप्रकारे कामे द्यावीत याबद्दल समाज विकास विभागाच्या वतीने जावक क्र. सविवि/३८६, दि.५.६.२०२४ चे निविदेनानुसार सादर करण्यात आले होते. या निवेदनास मा.मुख्यलेखाधिकारी व मा.उपायुक्त दक्षता यांची मानता झालेली आहे. सदर निवेदनाप्रमाने कार्यवाही व्हावी किंवा या चारही संस्थाना महापालिके अंतर्गत र.रु.३ लक्ष पर्यंतची कामे विना निविदा मिळणेस खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत

१. प्रबुद्ध स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या दोन संस्थांना रक्कम रुपये तीन लाखापर्यंतचे पुणे महानगरपालिका अंतर्गत करावयाची विविध कामे विना निविदा देणे व विविध सेवा घेणे तसेच स्वयंरोजगाराच्या योजना चालवण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत स्थायी समितीचा ठराव क्र.७८४ दि.३१/०७/२०१८ व या ठरावाच्या अनुषंगाने पारित झालेला महापालिका आयुक्त यांचा ठराव व कार्यालयीन परिपत्रक तसेच हेल्पलाइन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित व विश्वासआधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थांना शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन रक्कम रुपये तीन लाखापर्यंत लागणाऱ्या सेवा व वस्तू घेण्यासाठी काम विना निविदा देणे बाबत स्थायी समितीचा ठराव क्र. २८७४ दि.०८/०३/२०१९ व या ठरावाच्या अनुषंगाने पारित झालेला महापालिका आयुक्त यांचा ठराव व कार्यालयीन परिपत्रक प्रमाणे कार्यवाही होणेस.

२. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाला व पुणे महानगरपालिका सर्व विभागांमध्ये तातडीचे व आकस्मिक कामांबरोबरच नियमित परंतू ३ लाखांच्या आतील कामे करून घेणेसाठी ज्या संस्थांना मा. महापालिका आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता आहे अशा १) हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., २) विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., ३) प्रबुध्द स्वयंरोजगार सहकारी संस्था, ४) जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या संस्थांना एकसमान कामे देण्यात यावीत.

३. प्रत्येक संस्थेस प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रती वर्ष १० कामे व प्रत्येक परिमंडळ निहाय प्रत्येक संस्थेस प्रति वर्ष १० कामे या मयदित कामे देण्यात यावीत.

४. या कामाचा हिशोब प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय व प्रत्येक परिमंडळ निहाय ठेवणेत यावा.

५. सुशिक्षित बेरोजगारांच्या कामे देण्याच्या धोरणात शासनाने काही बदल केल्यास तसा बदल वरील चार संस्थांबाबत वेळोवेळी करण्यात यावा.

विषय क्र. ३८६त्वर्य

मा.विशाल धनवडे यांचे, दि.०२/०७/२०२६ चे पत्र.

कर्वेनगर, गणेशनगर ओटा वसाहतीमधील अलंकार पोलीस स्टेशन लगत असलेल्या नाल्यास लागून सीमाभिंत बांधण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्र. ३८७त्वर्य

मा.कोमल सारंग नवले यांचे, दि.२३/०६/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून पुण्यामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे टँकर भरण्याकरिता वाल्व उपलब्ध आहेत. त्या वाल्व मधून पुणे महानगरपालिकेचे पाण्याचे टँकर व खाजगी टैंकर नियमानुसार काही रक्कम आकारून खाजगी टँकर धारकांना पाण्याचे टँकर भरू दिले जातात, असा निर्णय झाला असताना देखील आमच्या प्रभाग क्रमांक 34 मध्ये उपलब्ध असलेल्या महानगरपालिकेच्या वाल्व व मधून खाजगी पाण्याच्या टँकर वाल्यांना महानगरपालिकेच्या नियमानुसार काही रक्कम आकारून टैंकर भरून दिले जात नाहीत.

सध्याच्या परिस्थितीमध्ये दिवसाआड पाणी येत असल्याने पाण्याकरिता नागरिकांना मोठ्या प्रमाणामध्ये पाणी समस्या भेडसावत आहे. अशा परिस्थितीमध्ये अनेक टँकर धारक वेगवेगळ्या ठिकाणावरून खाजगी वाल्व मधून पाण्याचे टँकर भरून घेतात. काही ठिकाणचे पाणी है दूषित असल्याने नाविलाजास्तव नागरिकांना विकत घ्यावे लागते. हे दूषित पाणी पिल्याने नागरिकांना आरोग्याची समस्या तयार होऊ शकते.

हे सर्व प्रकार टाळण्याकरिता व नागरिकांची आरोग्याची काळजी घेण्याकरिता, प्रथम महानगरपालिकेचे टँकर भरून दिल्यानंतर हे खाजगी पाण्याचे टँकर महानगरपालिकेच्या नियमानुसार चार्जेस आकारून भरून दिले जावेत. वडगाव धायरी मधील पाण्याचे टँकर भरण्याच्या वाल्व मधून महानगरपालिकेच्या टँकर बरोबर खाजगी टँकर धारकांना महानगरपालिकेच्या नियमानुसार रक्कम आकारून खाजगी पाण्याचे टँकर भरून मिळण्यास मान्यता मिळावी.

विषय क्र. ३८८त्वर्य

मा.तुपे प्रशांत वसंतराव व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे, दि.०२/०७/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, तसेच शिक्षण मंडळ आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (PMPML) चे सर्व आजी व माजी सदस्य यांनी पुणे शहराच्या विकासात, लोकसेवेत आणि प्रशासकीय कामकाजात मोलाचे योगदान दिले आहे व देत आहेत. सद्यस्थितीत वाढते वैद्यकीय खर्च आणि आरोग्याच्या वाढत्या समस्या लक्षात घेता, या सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधींना व सदस्यांना, तसेच त्यांच्या कुटुंबाला सामाजिक व आरोग्यविषयक सुरक्षा देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत 'अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना' राबविली जाते. या योजनेची व्याप्ती वाढवून लोकप्रतिनिधी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांना वैद्यकीय कवच देणे आवश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेचे सर्व आजी व माजी सभासद, शिक्षण मंडळाचे सर्व आजी व माजी सदस्य, तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (PMPML) चे सर्व आजी व माजी सदस्य यांना, तसेच त्यांचे पती / पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली दिव्यांग अपत्ये यांना पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सुरु असलेल्या 'अंशदायी वैद्यकीय सहाय्य कायमस्वरूपी लाभ देण्यास देण्यात यावी.

विषय क्र. ३८९त्वर्य

मा.अब्दुल गफूर अहमंद पठाण यांचे, दि.०१/०७/२०२६ चे पत्र.

प्रभाग क १९ कोंढवा खुर्द-कौसरबाग मध्ये विकास आराखड्यनुसार शिवनेरीनगर डीपी रस्ता विकसित करण्यात येत असुन ८०% काम पूर्ण झालेले आहे. परंतु या रस्त्यास जोडणारे रस्ते विकसित करण्यात आलेले नाही. मार्केटयार्ड गंगाधाम चौक ते कात्रज कोंढवा रोडला जोडणारा गंगाधाम रस्ता पासुन शिवनेरीनगर डीपी रोडला जोडणारे तीन रस्ते विकास आराखडया मध्ये दर्शविले आहे. त्या भागात मोठ्या प्रमाणात व्यवसायिक आस्थापणा असुन तीन चार मंगल कार्यालय आहेत. गंगाधाम रोड वरील आशापुरा माता मंदिर ते काकडे वस्ती पर्यंतचा बिबवेवाडी हद्दीतील परिसर प्रभाग क १९ कोंढवा खुर्द कौसरबाग मध्ये येत आहे. बिबवेवाडी सर्वे नं ६२१,६५३ मधुन एक रस्ता, दुसरा रस्ता सर्वे नं ६५४,६५५ मधुन तर तिसरा रस्ता सर्वे नं ६५६च्या हद्दी लगत असुन या भागामधुन शिवनेरीनगर डीपी रस्त्याला जोडणारे रस्ते विकसित केल्यास नागरिकांना रहदारीस जवळचे रस्ते उपलब्ध होवुन दिलासा मिळणार आहे.

प्रभाग क १९ कोंढवा खुर्द-कौसरबाग मधील विकसित होत असलेल्या शिवनेरीनगर डीपी रस्ता व गंगाधाम रोड यांना जोडणारे विकास आराखडयामधील प्रभागातील बिबवेवाडी हद्दीतील रस्ते विकसित करण्यासाठी रस्त्यामधील बाधीत क्षेत्राची जमीन महानगरपालिकेने ताब्यात घेवुन त्वरीत पथ विभागामार्फत तीनही रस्ते विकसित करावे तसेच यासाठी आवश्यक तरतुद उपलब्ध करुन दयावी.

विषय क्र. ३९०त्वर्य

मा.डॉ.दादा कोद्रे व मा.हरिदास चरवड यांचे, दि.०१/०७/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या प्रभाग क्रमांक १५ मध्ये 'साडेसतरा नळी' हा भाग येतो. महापालिकेत समाविष्ट होऊन जवळपास ८ वर्षे पूर्ण झाली असली, तरी हा परिसर आजही तीव्र पाणी टंचाईचा सामना करत आहे. सद्यस्थितीत या भागात पुणे महानगरपालिकेकडून टँकरने व अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. येथील स्थानिक नागरिकांना सध्या ३ ते ४ दिवसांतून केवळ एकच वेळा, आणि तेही रात्री १२:०० ते पहाटे ३:०० या अत्यंत गैरसोयीच्या वेळेत पाणी उपलब्ध होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि दैनंदिन जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने 'समान पाणी पुरवठा प्रकल्प' अंतर्गत साडेसतरा नळी भागासाठीचा 'विकास आराखडा / डीपीआर (DPR)' तयार केला आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास परिसराचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकतो. प्रभाग क्रमांक १५ मधील साडेसतरा नळी परिसरातील नागरिकांची पाणी टंचाईतून कायमस्वरूपी मुक्तता करण्यासाठी, पाणीपुरवठा विभागाने तयार केलेल्या 'समान पाणी पुरवठा प्रकल्प विकास आराखड्यास (DPR)' मान्यता देण्यात यावी, तसेच, सदर विकास आराखड्यानुसार प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी विनाविलंब सुरू करण्यासाठी आवश्यक असणारा निधी 'समान पाणी पुरवठा प्रकल्प' या मुख्य योजने अंतर्गत मंजूर करण्यात यावा.

विषय क्र. ३९१त्वर्य

मा.हरिदास कृष्णा चरवड व मा.संदिप बेलदरे यांचे, दि.०१/०७/२०२६ चे पत्र.

पुणे शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची गरज, धरणांमधील गाळ, कालव्यांतील पाण्याची गळती, पुनर्वापर, जलसंधारण तसेच दीर्घकालीन जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्वंकष "पुणे जलसुरक्षा कृती आराखडा (Pune Water Security Action Plan)" तयार करून तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत झपाट्याने नागरीकरण होत असून शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शैक्षणिक राजधानी, सांस्कृतिक राजधानी, उत्सावांची राजधानी, उदोगांची राजधानी, अशी ख्याती असलेले पुणे शहर, मोठ्या प्रमाणामध्ये देशभरातून तरुण नागरिक वास्तव्यासाठी पुण्यामध्ये आहे आणि मोठ्या प्रमाणामध्ये त्यांना घरांची गरज भासत आहे आणि मोठ्या प्रमाणामध्ये बांधकाम होत आहेत. नवीन बांधकाम नियमवाली प्रमाणे वाढीव एफएसआय (FSI), नवीन उपनगरे, उंच इमारती, आयटी पार्क, व्यावसायिक संकुले आणि नवीन निवासी प्रकल्प यामुळे पुढील 10 ते 15 वर्षांत पिण्याच्या पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सध्या अनेक भागांमध्ये दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ येत असून भविष्यात ही परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

पुणे शहराचा प्रमुख पाणीपुरवठा खडकवासला धरण साखळी प्रणालीवर अवलंबून आहे. अनेक वर्षांपासून धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे साठवणूक क्षमता कमी होत आहे. तसेच कालवे, जलवाहिन्या आणि वितरण व्यवस्थेमध्ये होणारी पाण्याची गळती ही मोठी समस्या आहे. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, पुनर्वापर आणि जलसंधारणाशिवाय भविष्यातील पाणीटंचाई टाळणे शक्य होणार नाही.

त्यासाठी पुढील उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात :

1. खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर आदी धरणांचे वैज्ञानिक सर्वेक्षण करून डी-सिल्टिंग (Desilting) कार्यक्रम हाती घेण्यात यावा, जेणेकरून धरणांची मूळ जलसाठा क्षमता वाढेल. यासाठी पुणे मनपा ने संयुक्त प्रकल्प करावा. दरवर्षी सर्व धरनांचा गाळ काढणाची प्रक्रिया जलसंपदा विभाग व मनपा संयुक्त प्रकल्प करावा.
2. धरणांच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मृदसंधारण, गाळ अडविणारे बंधारे, चेक डॅम, कंटूर ट्रॅचेस व वृक्षारोपण करून भविष्यात गाळ साचण्याचे प्रमाण कमी करण्यात यावे...
3. पाटबंधारे विभाग व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दीर्घकालीन जलव्यवस्थापन प्रकल्प तयार करण्यात यावा,
4. कालवे, जलवाहिन्या व वितरण व्यवस्थेचे Leak Detection Audit करून गळती तातडीने थांबविण्यात यावी. आवश्यक त्या ठिकाणी SCADA प्रणाली व स्मार्ट मीटरिंगचा वापर करावा,
5. महानगरपालिकेच्या सर्व एसटीपी (Sewage Treatment Plant) ची क्षमता वाढवून प्रत्येक ३ ते ४ किलोमीटर अंतरावर आधुनिक एसटीपी उभारावेत. त्यांची वेळोवेळी तपासणी यंत्रणा कार्यन्वित करावी.
6. खाजगी सोसायटीने एसटीपी द्वारे शुद्ध केलेले पाणी उद्योग, बागा, बांधकाम, फ्लशिंग, रस्ते धुणे तसेच इतर बिगर पिण्याच्या वापरासाठी अनिवार्य करण्यात यावे, जेणेकरून पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी होईल.

7. नदीमध्ये सोडण्यात येणारे सर्व सांडपाणी १००% शुद्ध करूनच सोडण्यात यावे, त्यामुळे खालच्या प्रवाहातील शेतकऱ्यांना दर्जेदार पाणी उपलब्ध होईल. त्याबदल्यात पाटबंधारे विभागामार्फत पुणे शहराला वाढीव पाणी देण्याबाबत शासन स्तरावर करार करण्यात यावा.

8. सर्व नवीन बांधकामांमध्ये Rainwater Harvesting, Recharge Well, Dual Plumbing System आणि Grey Water Recycling सक्तीचे करण्यात यावे तसेच विद्यमान इमारतींमध्येही त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

9. हौद, तलाव, ओढे, नाले आणि नैसर्गिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करून भूजल पुनर्भरण वाढविण्यात यावे.

10. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचे District Metered Area (DMA) मध्ये विभाजन करून Non-Revenue Water (NRW) १०% पेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे.

11. सर्व शासकीय, निमशासकीय, व्यावसायिक व मोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये पाण्याचे वार्षिक Water Audit बंधनकारक करण्यात यावे.

12. भविष्यातील २०५० पर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करून नवीन जलस्रोत, घरणे, बौज, पुनर्वापर प्रकल्प व जलवाहिन्यांचे नियोजन करण्यात यावे

13. जलसंधारणासाठी नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

14. बांधकाम परवानगी देताना उपलब्ध पाणी, एसटीपी क्षमता आणि पायाभूत सुविधांचा शाखीय आढावा घेऊनव मंजुरी देण्यात यावी. शक्य झाल्यास बांधकाम sिi पूर्वीसारखी नियमावली करण्यात यावी.

15. हवामान बदल (Climate Change) लक्षात घेऊन पुणे शहरासाठी स्वतंत्र Water Resilience Policy तयार करण्यात यावी.

16. महानगरपालिका, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलसंपदा तज्ज्ञ, पर्यावरण तज्ज्ञ, आयआयटी/सीओईपीसारख्या शैक्षणिक संस्था आणि नागरिक प्रतिनिधी यांची उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करून सहा महिन्यांत सर्वंकष अहवाल सादर करण्यात यावा.

17. पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व विद्यमान गृहनिर्माण प्रकल्प, टाउनशिप, व्यावसायिक संकुले, आयटी पार्क तसेच संस्थांमध्ये नियमांनुसार उभारण्यात आलेले एसटीपी (Sewage Treatment Plant) कार्यरत आहेत किंवा नाहीत याची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात यावी. जे एसटीपी बंद आहेत, अपूर्ण क्षमतेने चालू आहेत किंवा कार्यरत नाहीत, त्यांच्यावर संबंधित कायदे, नियम व परवानगीच्या अटींनुसार कठोर कारवाई करून ते तातडीने पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात यावेत. सदर प्लांट चालवण्यासाठी महानगरपालिकेतर्फे मदत करण्यात यावी किंवा त्यांना टॅक्स मध्ये सवलत मिळावी तसेच त्या ठिकाणी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा बागकाम, फ्लशिंग, वाहन धुलाई, बांधकाम तसेच इतर बिगर पिण्याच्या वापरासाठी अनिवार्य पुनर्वापर करण्यात यावा. यामुळे शुद्ध पिण्याच्या पाण्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि शहराच्या जलसुरक्षेला दीर्घकालीन बळकटी मिळेल.

18. मोठ्याप्रमाणात पाणी बचत, पाणी व्यव स्थापन, पाणी रेट्रीटमेंट आणि पुनरवपार यासाठी जलसाक्षरता अभियान व लोकजागृती राब विण्यात यावे.

पुणे महानगरपालिकेने राज्य शासन, जलसंपदा विभाग व संबंधित सर्व यंत्रणांशी समन्वय साधून पुणे शहराच्या पुढील अनेक दशकांच्या पाणी सुरक्षिततेसाठी सर्वंकष पुणे जल सुरक्षा कृती आराखडा "Pune Water

Security Action Plan" तयार करून टप्प्याटप्प्याने अंमलात आणावा. मनपा आणि जलसंपदा संयुक्त प्रकल्प करण्यात यावा.पुणे मनपा व पाटबंधारे विभाग संयुक्त जलव्यवस्थापणा प्रकल्प राबिविण्यात यावा.

पुणे महानगरपालिका व जनसंपदा विभाग महाराष्ट्र शासन संयुक्त प्रकल्प राबवून पुणे जलव्यवस्थापन, जलसुरक्षा प्रकल्प राबवून धरणाचा गाळ काढणे, गळती थांबवणे, एसटीपी प्लांट्स द्वारे स्वच्छ पाणी पुनर्वापर, जलसाक्षरता लोकजागृती जलस्त्रोत संवर्धन प्रकल्प राबिविण्यात यावा.

विषय क्र. ३९२त्वर्य

मा.रत्नमाला संदिप सातव यांचे, दि.२९/०६/२०२६ चे पत्र.

विषयः- नवीन समाविष्ट गाव वाघोली येथील बालाजी विहार (केसनंद रोड) व गणेश पार्क (गणेशनगर) परिसरात अतिरिक्त १०० KVA क्षमतेचे रोहित्र (Transformer) बसविण्यासाठी निधी मंजूर करणे बाबत.

नवीन समाविष्ट गाव वाघोली येथील बालाजी विहार, केसनंद रोड तसेच गणेश पार्क, गणेशनगर या परिसरात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून पहिल्या विद्युत रोहित्रांवर क्षमतेपेक्षा जास्त भार पडत आहे. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीजपुरवठा होणे व नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. सध्या १२० ते १३० व्होल्टेज आहे. त्यामुळे विद्युत उपकरणे चालत नाहीत. नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी व भविष्यातील वाढता वीजभार लक्षात घेऊन या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी अतिरिक्त १०० KVA क्षमतेचे रोहित्र बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागाकडून आवश्यक अंदाजपत्रक तयार करून, उपलब्ध तरतुदीतून अथवा आवश्यक असल्यास पूरक निधी उपलब्ध करून खालील कामांना मान्यता देण्यात यावी.

१) बालाजी विहार, केसनंद रोड, वाघोली येथे अतिरिक्त १०० KVA रोहित्र बसविणे.

२) गणेश पार्क, गणेशनगर, वाघोली येथे अतिरिक्त १००KVA रोहित्र बसविणे.

सदर कामांसाठी आवश्यक निधी मंजूर करून संबंधित विभागास तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत. ही विनंती

नगरसचिव
पुणे महानगरपालिका